—: प्रेसनोट :—　　　　दिनांक : १६.०७.२०१८

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २६/२०१८ |
| कलम | कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालय | बिपीन बाळकृष्ण चव्हाण, वय ३० वर्षे, हुद्दा — पोलीस उप निरीक्षक, दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. १०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचा कपडयाचा व्यापार असून त्यांचे विरूध्द दिंडोशी पोलीस ठाणेत रद्द झालेल्या कपडयाच्या ऑर्डरचे पैसे परत न दिल्याबाबत तक्रारी अर्ज करण्यात आला होता. सदर तक्रारी अर्ज लोकसेवक बिपीन चव्हाण, पोलीस उप निरीक्षक यांचेकडे चौकशीकामी देण्यात आला होता. सदर तक्रारी अर्जावर कारवाई न करता अर्ज मिटवून टाकण्यासाठी लोकसेवकाने रू. १०,०००/— इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली.<br><br>फिर्यादीला लोकसेवकाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता आरोपी लोकसेवकाने पंच साक्षीदारामार्फत फिर्यादीकडे रू. १०,०००/— इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी लोकसेवक बिपीन बाळकृष्ण चव्हाण, पोलीस उप निरीक्षक, दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई याचे विरूध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.
टोलफ्री क्र.१०६४,दूरध्वनी क्र.०२२—२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२—२४९२२६१८,
वेबसाईट — acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक - www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
व्हॉट्स ॲप क्रमांक — ९९३०९९७७००

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( एम.एन.मुगुटराव )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
ला.प्र.वि.,मुंबई विभाग, मुंबई.